**नि.दि.दा.क्र. ३६/२०१२**

**नि. १७७ व ३०१ लगत**

**<u>उर्वरीत उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ५ तर्फे ॲड टी.आर.पवार यांच्यातर्फे शपथेवर सुरु–</u>**

हे म्हणणे खरे आहे की रे.दि.मु.नं.११२/१९८० या दाव्याचा निकाल मा. उच्च न्यायालयापर्यंत कायम राहिला आहे. हे म्हणणे खरे आहे की आम्ही मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले नाही. हे मी वाचलेले नाही की रे.दि.मु.नं.११२/१९८० या दाव्यामध्ये खंडू व विठ्ठल यांच्यात सन १९३० मध्ये वाटप झाले आहे असे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की सन १९३० मध्ये वाटप झाल्याचे देखील या दाव्यात कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की दाव्यामध्ये सन १९३० साली वादीचे पूर्वज विठ्ठल यांनी रे.दि.मु.नं.११२/१९८० या दाव्यात प्रतिवादींच्या पूर्वजांमध्ये वाटप झाले होते असे कथन केले असले तरी ते कबूल न करता व मान्य न करता सदर वाटप ॲक्ट अपॉन झाले नव्हते असे कथन केले आहे. हे मला माहिती नाही की सदर दाव्यामध्ये जबाब कोणी दिला होता. हे म्हणणे खरे नाही की जबाब देताना शपथेवर सन १९३० साली वाटप झाल्याचे सांगितले होते. सन १९३० रोजीचे वाटप ॲक्ट अपॉन झाले नव्हते असे पूर्वीच्या दाव्यामध्ये नमुद केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की गौतम विठ्ठल हे सन १९९६ मध्ये वारले. हे म्हणणे खरे आहे की गौतम विठ्ठल याने खरेदी केलेल्या मिळकतींचे खरेदीपत्रे या दाव्यात सामील केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की किती साली कोणती मिळकत खरेदी केली व किती रुपयांना खरेदी केली याचा उल्लेख दाव्यात केलेला नाही. दशरथ व गौतम हे बैल विक्रीचा व्यवसाय करायचे हे दाखवण्याकरीता कागदोपत्री पुरावा उपलब्ध झाल्यास मी दाखल करु शकतो. बैल विक्री व्यवसायातुन मिळालेल्या पैशाबाबत कागदोपत्री पुरावा उपलब्ध झाल्यास मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की बैल विक्रीच्या व्यवसायाबाबत दशरथ यांना प्रत्यक्ष माहिती आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की मला त्याबद्दल वडीलांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की दशरथ व गौतम यांना बैल विक्रीचा व्यवसाय करताना मी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की बैल विक्रीच्या व्यवसायातुन मिळणा–या पैशातुन त्यांनी काही जमीनी खरेदी केल्या हे मी खोटे सांगत आहे.

प्रश्न – फेरफार क्र.२११९७ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या खरेदीच्या मिळकती आहेत असे म्हटले तर बरोबर होईल का.

उत्तर – सदर फेरफार बघितल्या शिवाय मला त्याबाबत सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे नाही की फेरफार क्र.२११९७ हा मी कधीही बघितलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की खंडेराव याने मोरे मळा १०/२अ हा विकला. परंतु, तो किती साली विकला व

किती रुपयांना विकला याबाबतचे खरेदीपत्र मी दाव्यात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदरचे खरेदीपत्र आम्ही आव्हानित केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की शेरकर यांना दाव्यामध्ये सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की रि.स.नं.९४१/९ ला प्रतिवादी क्र.१ ते ३ व ६ ते ८ यांच्या नावाची नोंद आहे. रि.स.नं.९४१/९ ला वादी व प्रतिवादी यांच्या नावाच्या नोंदी आहेत. हे म्हणणे खरे आहे की रि.स.नं.९४१/९ मध्ये परडे आहे. रि.स.नं.९४१/९ च्या पश्चिमेस रि.स.नं.९४१/५ आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ ते ३ हे तिघेही मुंबई येथे मिलमध्ये नोकरीस होते. हे म्हणणे खरे नाही की मारुती खंडेराव माने हे सन १९६८ ते सन १९७४ पर्यंत पंचक्रोशी शिक्षण मंडळात शिपाई या पदावर नोकरी करत होते. हे म्हणणे खरे आहे की रि.स.नं.९४१/२ चा हल्लीचा नंबर ९४१/२ब असा आहे व त्याचे क्षेत्र ५ गुंठे आहे. सदर जमीन मुळची तात्याबा परशाबा माने यांची होती. हे म्हणणे खरे नाही की सदर जमीन मारुती खंडेराव माने याने खरेदी केली. सन १९७४ मध्ये खंडू व विठ्ठल यांच्या कुटुंबाचे एकत्र व्यवहार होते हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा उपलब्ध झाल्यास मी दाखवू शकतो. हे मला माहिती नाही की सुरेश हा सन १९८७ पासून रहिमतपुर नगर पालीका येथे नोकरीस होता. हे म्हणणे खरे आहे की मयत प्रतिवादी क्र.५ हा नोकरीस होता. परंतु, तो मिलीट्रीत नोकरीस होता का हे मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की अनुक्रमांक २६ ते २९ वरील दावा मिळकती या पुरुषोत्तम नरहरी देशपांडे यांच्या मालकीच्या होत्या. हे मला माहिती नाही की सदर मिळकती दिनांक ०९/०५/१९९४ रोजी रक्कम रुपये ७४,०००/- ला सुरेश व संजीवन यांनी खरेदी केल्या. हे मला माहिती नाही की खरेदीपत्रानुसार सदर मिळकतींना सुरेश व संजीवन यांच्या नोंदी झाल्या. रि.स.नं.९४१/२ब याचे क्षेत्र ५ गुंठे आहे. हे म्हणणे खरे आहे की त्याच्या दक्षिणेस रहिमतपुर ब्रम्हपुरी हा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर ५ गुंठे क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्र.३ ते ५ यांचे सन १९९१ पूर्वी परडे व घर होते. हे म्हणणे खरे आहे की त्यामध्ये सन १९९१ मध्ये मारुती व त्याच्या मुलांनी बंगलोरी कौलारु घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की ते घर बांधताना माझे वडील हयात होते. हे म्हणणे खरे आहे की सदर घर बांधताना माझे वडील अथवा दशरथ यांनी हरकत घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की त्या घराचा मुन्सीपल क्र.१६९४अ/३ असा आहे. हे मला माहिती नाही की सदर घर हे नगरपालिकेत तिघांच्या नावाने होते. हे म्हणणे खरे आहे की सदर घराच्या नोंदीस माझे वडील अथवा दशरथ यांनी हरकत घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की सदर मिळकतीमध्ये मारुती याचे रस्त्याला लागून किराणा मालाचे शेड होते. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी जुने घर पाडून त्या जागेवर आर.सी.सी.इमारत बांधली. हे म्हणणे खरे आहे की सदर आर.सी.सी. इमारत बांधताना मी अथवा दशरथ यांनी हरकत घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत मारुती

याच्या ताब्यात असल्याने सन १९९१ मध्ये घर बांधते वेळी व आर.सी.सी.इमारत बांधते वेळी आम्ही हरकत घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत दाव्यामध्ये अनुक्रमांक २२ वर आहे. हे म्हणणे खरे आहे की दाव्यामध्ये सदर मिळकतीत प्रतिवादींनी बांधकाम करु नये अशी मनाई आम्ही मागितलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकत मुळची तात्या परशुराम माने यांची होती. हे म्हणणे खरे आहे की ५ आर क्षेत्राच्या पूर्वेला हिस्सा क्र.६, दक्षिणेला रस्ता, पश्चिमेला हिस्सा क्र.१ व उत्तरेला रि.स.नं.९४१/२ पैकी राहिलेले क्षेत्र आहे. हे मला माहिती नाही की मारुती माने यांनी रि.स.नं.९४१/२ब मधील ५ गुंठे क्षेत्र दिनांक १३/०२/१९७४ रोजी रक्कम रुपये ५००/– ला तात्या परशराम माने यांच्याकडून खरेदी केले. हे म्हणणे खरे आहे की सदर क्षेत्रामध्ये मारुती माने हे हयात असेपर्यंत त्यांची खरेदीपत्रापासून व त्यांच्यानंतर त्यांच्या मुलांची कब्जे वहिवाट मालकी हक्काने आहे. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे नं.११५३/२ब, ११५३/१३क, १११०/१३क या मिळकती खंडेराव याने गहाण दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की सदर मिळकती दिनांक २२/०३/१९३९ रोजी खंडेराव यांनी गहाण सोडवले होते. सदर मिळकतीला विठ्ठलच्या नावाची नोंद नव्हती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की कुठल्याच मिळकतीला नावाची नोंद नव्हती. हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे नं.११५३/२क व ११५३/४ब या मिळकती खंडेराव याने गहाण ठेवल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की सदर मिळकती दिनांक २२/०४/१९४५ रोजी १५०/– रुपये देवून सोडवल्या.

**प्रतिवादी वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

कोरेगाव **(ए. ए. पाचरणे)**

दि. ०५/११/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश कोरेगाव.